Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 28 November 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

राष्ट्रीय तपास संस्था अर्थात एनआयएनं मानवी तस्करीच्या गुन्ह्यांसंबंधी सहा राज्यातील २२ ठिकाणांवर छापे टाकले आहेत. परदेशात नोकरी देण्याचं अमिष दाखवून मानवी तस्करी करण्यासंबंधीचे गुन्हे जुलै महिन्यात दाखल करण्यात आले होते, त्यासंदर्भात छापेमारी करण्यात आली. दरम्यान, सायबर गुन्ह्यासंबंधी तपास करणाऱ्या अंमलबजावणी संचालनालयाच्या पथकावर दिल्लीतील बिजवासन भागात हल्ला करण्यात आला आहे.

****

झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन आज राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. राज्यपाल संतोष कुमार गंगवार रांची इथं होणाऱ्या समारंभात सोरेन यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील.

****

राज्यात सत्तास्थापनेसंदर्भात आज निर्णय होण्याची शक्यता आहे. शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे, भाजप नेते देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार आज दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार आहेत.

****

रविवार, एक डिसेंबर रोजी होणाऱ्या राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्वपरीक्षेसंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं परीक्षार्थींना नवीन प्रवेश प्रमाणपत्र जारी केलं आहे. आयोगाच्या संकेतस्थळावर यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे.

****

राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत केंद्रीय आरोग्य विभागाच्या पथकातर्फे अकोला जिल्ह्यातल्या आरोग्य विभागाच्या विविध योजनांसह पायाभूत सुविधांची पाहणी करण्यात येत आहे. या पथकानं काल शासकीय रुग्णालयाला भेटी देऊन

सुविधांची पाहणी केली. हे पथक तीन दिवस जिल्ह्यातल्या सर्व शासकीय रुग्णालयांची पाहणी करणार आहे.

****

नांदेड जिल्हा प्रशासनाच्यावतीनं सोमवारी दोन डिसेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही दिनाचं आयोजन करण्यात आलं आहे. नागरिकांनी लोकशाही दिनामध्ये आपल्या तक्रारीसह उपस्थित राहण्याचं आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी केलं आहे.

****

राज्यात चार डिसेंबरला राष्ट्रीय जंतनाशक दिन राबवण्यात येत असून याअंतर्गत एक ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळी दिली जाणार आहे. या उपक्रमाला सहकार्य करण्याचं आवाहन नांदेड जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगिता देशमुख यांनी केलं आहे. जिल्ह्यात अर्धापूर, धर्माबाद, लोहा, मुदखेड, नांदेड आणि उमरी या तालुक्यांमध्ये ही मोहिम राबवली जाणार असून यादिवशी शाळेत अनुपस्थित विद्यार्थ्यांना दहा डिसेंबरला गोळी दिली जाईल असं देशमुख यांनी सांगितलं.

****

राज्य शासनानं हलक्या वाहनांच्या वितरकांची ऑनलाइन नोंदणीची सुविधा सुरू केली आहे. राज्यातल्या सर्व परिवहन कार्यालयांमध्ये ही सुविधा उपलब्ध असणार आहे. यासाठी वाहन वितरकांना वाहन मालकांच्या वतीनं Parivahan.gov.in या संकेतस्थळावर वाहन नोंदणीसाठी अर्ज करावा लागेल. वाहन मालकाच्या उपस्थितीशिवायही ही नोंदणी प्रक्रिया होऊ शकणार आहे.

****

राज्य शासनाने नंदुरबार जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला तेहेतीस नवीन रुग्णवाहिका दिल्या आहेत. यात अक्कलुकवा आणि शहादा तालुक्यांना प्रत्येकी नऊ तर धडगाव, नंदुरबार आणि नवापूर तालुक्याना प्रत्येकी चार आणि तळोदा तालुक्याला दोन रुग्णवाहिका दिल्या जाणार आहे. अक्कलकुवा आणि धडगाव तालुक्यांसाठी आणखी २६ रुग्णवाहीकांची मागणी जिल्हा आरोग्य विभागानं केली आहे.

****

कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तिर्थक्षेत्राचा संपुर्ण कायापालट करण्यासाठी दोन कोटी रुपयांचा आराखडा अंतिम करण्यात आला आहे. हा विकास आराखडा उच्चाधिकार समितीकडे सादर करण्यात आला आहे. लवकरच त्यास मान्यता

मिळेल आणि प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. दरम्यान मंदिर समितीच्या स्वनिधीतून ६० कोटी रुपयांची कामे हाती घेतली आहेत. यातून तुळजाभवानी देवीच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येणार आहे. पुजारी वर्ग आणि भाविकांच्या या कामाबाबत च्या सूचनांचा अंतर्भाव करण्यासाठी आज थोड्याच वेळात बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यानुसार जीर्णोद्धाराचे काम पूर्ण केले जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

****

थोर समाजसुधारक, स्त्री शिक्षणाचे अग्रणी महात्मा ज्योतिबा फुले यांचा आज स्मृतीदिन आहे. छत्रपती संभाजीनगर इथं डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ तसंच सत्यशोधक समाज प्रतिष्ठानच्या वतीनं विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

आळंदी इथं संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७२८ व्या संजीवन समाधी सोहळ्याचा मुख्य कार्यक्रम आज होत आहे. संजीवन समाधी सोहळ्याला २३ तारखेपासून सुरुवात झाली आहे. राज्यभरातील भाविक यासाठी आळंदीत दाखल झाले आहेत. संजीवन समाधी सोहळ्याची सांगता एक डिसेंबरला संत ज्ञानेश्वरांच्या छबीना मिरवणुकीनं होणार आहे.

****

ओमान इथं काल झालेल्या पुरुष ज्युनियर आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात भारताने थायलंडचा ११-० असा पराभव केला. भारताकडून अरिजित सिंग हुंदल, सौरभ आनंद कुशवाह आणि गुरजोत सिंग यांनी प्रत्येकी दोन गोल केले.

****